स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

सामाजिक शास्त्र अंतर्गत लोकप्रशासन विषयातील

पीएच.डी. संशोधन कार्यासाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

महसूल प्रशासनात मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका

विशेष संदर्भ नांदेड जिल्हा - एक प्रशासकीय अभ्यास.

संशोधकाचे नाव

श्री सुनिल पुंडलिकराव वाघमारे

एम.ए.नेट (लोकप्रशासन)

swkhanapur.358@gmail.com

मो.क्रं. 9158867141

वर्गवारी : अनुसूचित जाती (एस.सी.)

मार्गदर्शकाचे नाव

डॉ.बी.आर. कत्तूरवार

एम.ए.पीएच.डी.

लोकप्रशासन विभाग प्रमुख

देगलूर महाविद्यालय देगलूर

ता. देगलूर जि. नांदेड

मो.क्रं. 7385446542

महसुल प्रशासनात मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा - एक प्रशासकीय अभ्यास

प्रस्तावनाः-

प्राचीन काळापासून शासन व प्रशासन व्यवस्थेमार्फत तीन महत्वपुर्ण कार्य केली जात होती. त्यामध्ये जनतेकडून महसूल (शेतसारा) गोळा करणे , कायदा व सुव्यवस्था राखणे आणि न्यायदान करणे ही तीन कामे केली जात होती. स्वातंत्र्यानंतर लोककलयाणकारी राज्यांची संकल्पना स्वीकरल्यामुळे शासनाच्या पर्यायाने प्रशासनाच्या कार्यात प्रचंड वाढ झाली आहे. भारतामध्ये जिल्हा हा घटक विकासाचा केंद्रविंदू मानून प्रत्येक जिल्ह्याचा सर्वांगिण विकास घडविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि जिल्हा महसुल प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. जिल्हा महसूल प्रशासन हे खऱ्या अर्थाने जनतेला जीवनावश्यक सेवा सुविधा पुरविणे, संकटकाळात मदत करणे, जिल्ह्यातील जनतेच्या सर्वांगिण विकासाला चालना देणे, शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आणि जनतेच्या जिवीत व वित्त मालमत्तेचे संरक्षण करणे इ. महत्वपूर्ण कार्य जिल्हा महसुल प्रशासनामार्फत केले जाते.

शेकडो वर्षापासून जो समाज घटक राजकारण, शिक्षण, प्रशासन व अर्थकारण इ. घटकापासून उपेक्षित होता. अशा मागासवर्गीय सुशिक्षित स्त्री पुरुषांना आरक्षण धारेणाच्या माध्यमातून महसुल प्रशासनात सहभागी होता आले. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला अनुसरुन समाजात सकारात्मक परिवर्तन होऊ लागले आहे. तरी परंतू महसूल प्रशासनातील अधिकारी कर्मचारी वर्गाला आज देखील अनेक समस्यांना तोंड देत विविध अडचणींवर मात करीत प्रशासन चालवावे लागते.

महसुल / पैसा सर्व प्रशासकीय विभागाचा आत्मा होय असे म्हणल्यास काही वावगे ठरणार नाही. कारण प्रशासनाचे कोणतेही कार्य असो त्यासाठी महसुल किंवा पैशाची आवश्यकता असते. महसुलाशिवाय कोणतेही कार्य करता येत नाही. म्हणूनच शासनाने जिल्हा महसुल प्रशासन या नावाने प्रशासनाची निर्मिती केलेली आहे. शासनाच्या सर्वच विभागाची नाळ या महसुल खात्याशी जोडण्यात आलेली आहे. म्हणून अशा या महत्वपूर्ण असणाऱ्या महसुल प्रशासनाचे कार्य करणारे जे मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी असतात त्यांचे योगदान हे कशा पध्दतीने असते हे अभ्यासणे तितकेच महत्वपूर्ण आहे. या उद्देशाने मी या विषयाची निवड केली आहे.

अतिप्राचीन काळापासून मागासवर्गीय लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा वाईट प्रवृत्तीचा होता. त्यांना समाजामध्ये एक माणूस म्हणून जगणे असहाय करण्यात आलेले होते. अशा परिस्थितीमध्ये चिखलात एखादा कमल फुलावा या प्रमाणे या मागास जातीत 14 एप्रिल 1891 रोजी डॉ. बी. आर. आंबेडकर नावाचे कमल उमगले. तेंव्हा या युगपुरुषाने आपल्या सभोवती असणाऱ्या या दुष्ट चालीरीती व परंपरेच्या मानेवर पाय ठेवून उच्च शिक्षण घेतले. आणि आपल्या शेकडो मागासवर्गीय बंधु भगिनींना उच्च शिक्षणाची दारे खुले करुन दिले. म्हणूनच आज राज्यात देशातच नव्हे तर जगाच्या कोणत्याही पाठीवर मागासवर्गीय माणूस जाऊन पोहोचला आहे. त्यांनी स्वबळावर आपला सामाजिक, राजकीय, आर्थिक व प्रशासकीय विकास करुन घेतलेला आहे. म्हणूनच महसुल प्रशासनाच्या महत्वपूर्ण खात्यामध्ये आज मागासवर्गीय माणूस मुख्य सचित, सचिव, विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार , नायब तहसिलदार , मडळ अधिकारी , तलाठी व कोतवाल अशा विविध पदावर राहून आपले कर्तव्य अतिशय प्रामाणिकपणे बजावित आहेत.

परंतू दूर्देवाची बाब अशी की, एवढे प्रामाणिक कार्य करुन सुध्दा या मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याची दखल कोणीही घेत नाही. म्हणून मी संशोधक या नात्याने महसूल प्रशासनात मागासवगीर्यय अधिकारी व कर्मचाऱ्यांची भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा - एक प्रशासकीय अभ्यास हा विषय संशोधनासाठी , अध्ययनासाठी निवड करुन त्यांना प्रकाशात आणण्याचे कार्य हातात घेतले आहे. जेणेकरुन या संशोधनाच्या माध्यमातून त्या मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रकाशात आणण्याचा व त्यांचा कार्याचा ठेवा संशोधनाच्या माध्यमातून कुठेतरी अस्तित्वात असावा म्हणून मी हा छोटासा प्रबंध करणार आहे.

नमुना निवडः-

नांदेड जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय, 8 उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि 16 तहसिल कार्यालय आणि मंडळ अधिकारी, तलाठयांची प्रत्यक्ष भेट त्यांच्याशी संवाद साधून प्रश्नावली व अनुसुचीच्या मदतीने संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

संशोधनाची गृहीत कृत्येः-

1) महसुल प्रशासनातील मागासवर्गीय आणि उच्चवर्णीय अधिकाऱ्यांचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत.

2) मागासवर्गीय अधिकाऱ्याकडे पाहण्याचा सर्वसामान्य नागरीकांचा दृष्टिकोन पूर्वग्रह दुषित आहे.

3) मागासवर्गीय अधिकाऱ्यांना अनेक समस्यांवर मात करुन प्रशासन चालवावे लागते.

4) मागसवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संघटनांचे योगदान प्रभावी आहे.

5) मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या विशेष योगदानामुळे मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावी होत आहे.

6) महसुल प्रशासनात मागासवर्गीय अधिकारी उच्चवर्णीयांच्या दबावाला बळी पडत नाहीत.

संशोधनाची उदिष्टेः-

1) भारतातील महसुल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभुमी जाणुन घेणे.

2) महसुल प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाज चालवित असताना येणाऱ्या विविध समस्या व अडचणींचा अभ्यास करणे.

3) मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कौटुंबिक, सामाजिक , शैक्षणिक व आर्थिक पार्श्वभुमी जाणुन घेणे.

4) मागासवर्गीय अधिकारी व उच्चवर्णीय अधिकारी तसेच मागासवर्गीय अधिकारी व उच्चवर्गीय नागरीक यांच्यातील संबंध कसे आहेत हे जाणुन घेणे.

5) मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या असलेल्या विविध संघटना व त्यांचे योगदान जाणुन घेणे.

6) मागासवर्गीय अधिकारी व प्रसानमाध्यमे यांच्यातील संबंध अभ्यासणे.

7) मागासवर्गीय अधिकाऱ्यांना समाज व्यवस्थेत आणि प्रशासन व्यवस्थेत कशी वागणुक मिळते याचा शोध घेणे.

संशोधन आराखडाः-

प्रस्तूत संशोधन विषयावर शास्त्रीय पध्दतीने तथ्य संकलित केल्यानंतर खालील प्रकरणनिहाय शोधनिबंधची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण 1 ले

1.1 विषय प्रवेश

1.2 विषय निवडण्या मागची भुमिका

1.3 विषयाचे महत्व आणि प्रस्तुतता

1.4 संशोधनाची उदिष्टे

1.5 संशोधनाची गृहितकृत्ये

1.6 संशोधनाची मर्यादा

1.7 संशोधन पध्दती

1.8 साहित्य समालोचन

प्रकरण 2 रे

मागासवर्गीय समाज आणि आरक्षण धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभुमी

प्रकरण 3 रे

नांदेड जिल्हा महसुल प्रशासन एक दृष्टिक्षेप.

प्रकरण 4 थे

मागासवर्गीय अधिकारी व नागरिक संबंध.

प्रकरण 5 वे

मागासवर्गीय अधिकारी व नागरिक संबंध.

प्रकरण 6 वे

मागासवर्गीय अधिकाऱ्यांचे कार्य व योगदान.

प्रकरण 7 वे

निष्कर्ष व शिफारशी

- संदर्भ ग्रंथ सूची

- परिशिष्टे